# VJTI MUMBAI
वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था
Veermata Jijabai Technological Institute
(Autonomous Institute of Govt. of Maharashtra)
H. R. Mahajani Road, Matunga (East), Mumbai - 400 019
Phone:+91 22 24198101/102 • Fax:+91 22 24102874 • www.vjti.ac.in


क्र.लेखा/शिवृ/पं.दि.उ.स्वयम् योजना/२५-२६/३४८५/२०२५ दिनांक :२९/०९/२०२५

29 SEP 2025

## शासकीय वसतीगृह प्रवेश
## किंवा
## शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता पंडीत दीनदयाळ उपाध्याय स्वयम् योजना
## (अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता)

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता संस्थेतील फक्त प्रथम वर्ष पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास शिकत असणाऱ्या अनुसूचित जमातीच्या (ST) प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सदर परिपकाद्वारे सूचित करण्यात येते की, शासकीय वसतीगृहात प्रवेश घेण्यास पात्र असलेल्या परंतू शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या तसेच भाडे तत्वावर राहत असणाऱ्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतीगृहातील मुलां-मुलीप्रमाणे भोजन, निवास, शैक्षणिक साहीत्य, निर्वाह भत्ता व इतर आवश्यक सुविधा स्वत: उपलब्ध करून घेण्यासाठी अनुसूचित जमातीच्या (ST) विद्यार्थ्यांकरीता पंडीत दीनदयाळ उपाध्याय स्वयम् योजना शासनाने सुरु केलेली आहे. सदर योजने अंतर्गत प्रति वर्षी ६०,०००/- इतकी रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट शासनामार्फत जमा केली जाईल. सदर योजनेकरीता विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न २,५०,०००/- किंवा त्यापेक्षा कमी असणे बंधनकारक आहे.

तरी शासकीय वसतीगृहात प्रवेश घेण्याकरिता किंवा सदर योजनेचा लाभ घेण्याकरीता नवीन (Fresh) तसेच नुतनीकरण (Renewal) विद्यार्थ्यांनी स्वत: https://swayam.mahaonline.gov.in/ या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरावा व सदर ऑनलाईन भरलेला अर्ज व संबंधीत कागदपत्र त्वरीत शिष्यवृत्ती विभागात आणून द्यावयाचे आहेत. तसे न केल्यास आपण या योजनेपासून वंचित राहील्यास याची सर्वस्वी जवाबदारी विद्यार्थी व पालकांची राहील याची गांर्भीयाने नोंद घ्यावी.

अध्यक्ष
शिष्यवृत्ती समिती

टीप :

१. व्ही.जे.टी.आय. वसतीगृहातील विद्यार्थीसुध्दा या योजनेस पात्र राहतील.
२. M.Tech. अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना जर विद्या वेतन (Stipend) मिळत नसेल तरच ते या योजनेस पात्र राहतील.

प्रत : सर्व विभागप्रमुख, सुचना फलक, वसतीगृह, ग्रंथालय, टिपीओ, संस्थेचे संकेतस्थळ